सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
मॉडेल कॉलनी , बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/शै.वि.-४/मुदतठेव/२०२४/ 3008 दिनांक : 23 JUL 2024

**परिपत्रक-**

**प्रति,**
संस्था प्रमुख/प्राचार्य/संचालक
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त व्यावसायिक
अभ्यासक्रमाच्या सर्व संस्था
पुणे विभाग.

**विषय : तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारित संस्था सुरू करताना/ विविध अभ्यासक्रम सुरू करण्याच्या अनुषंगाने संचालक, तंत्रशिक्षण व संस्था यांच्या संयुक्त खात्यात ठेवण्यात आलेल्या मुदतठेवींबाबत.**

संदर्भ : १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.तंशिविकापु/विवि-४/मुदतठेव/२०२२/५४७३ दि.२३.११.२०२२
२. शासन निर्णय क्र.टिईडी-२०१८/(प्र.क्र.२३५/१८)/तांशि-५ दि.२२.०११.२०२८
३. महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४,/उच्च व तंत्रशिक्षण विभाग दि.१७.०२.२०२०.

उपरोक्त विषयास अनुसरून या कार्यालयाचे अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यात येते की, संस्था व संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संयुक्त नावे असलेल्या मुदतठेवींचे नुतनीकरण करणे/मुदतठेव मोडून रक्कम व व्याज संस्थेच्या खात्यात जमा करणे/संस्था बंद पडल्याने / अभ्यासक्रम बंद केल्याने/पडल्याने मुदतठेव मोडण्याबाबतचे संस्थेचे प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त होतात. परंतु सदर प्रस्तावामध्ये आवश्यक कागदपत्रे व माहिती सादर न केल्याने प्रस्तावास त्रुटी लागून या कार्यालयाचा व संस्थेचा अमुल्य वेळ खर्ची होत आहे.

यास्तव या परिपत्रकान्वये सर्व संस्थाना कळविण्यात येते की, वरील विषयाचे अनुषंगाने प्रस्ताव सादर करीत असताना खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करूनच प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात यावेत.

| अ. क्र. | मुदत ठेवीचे नुतनीकरण करून व्याज संस्थेच्या खात्यात जमा करणेबाबत. | मुदतठेवीला दहा वर्षापेक्षा अधिक कालावधी झाल्याने मुदतठेव व व्याज संस्थेच्या खात्यात जमा करणेबाबत. | संस्था बंद पडल्याने/अभ्यासक्रम बंद पडल्याने / केल्याने मुदतठेव व व्याज संस्थेच्या खात्यात जमा करणेबाबत |
|---|---|---|---|
| | १ | २ | ३ |
| १ | ---------------------- | -------------------------- | संस्था/अभ्यासक्रम बंद केल्याचा/झाल्याचा शासन निर्णय जोडणे आवश्यक |
| २ | ---------------------- | मुदतठेव मोडावयाची असल्यास संस्थेच्या संचालक मंडळावरील सर्व सभासदांच्या सहयांच्या ठरावाचे पत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक. | |
| ३ | ---------------------- | परिपत्रका सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे स्टँप पेपरवर हमी पत्र प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक. | |
| ४ | मुदतठेवीच्या प्रतीवर बँकेच्या शाखेचे नाव व पुर्ण पत्ता (पिनकोड सह),संस्थेचा डीटीई कोड, अभ्यासक्रमाचा स्तर (पदवी/पदविका/पदव्युत्तर पदवी), अभ्यासक्रमाचे नाव नमुद करून संस्थेच्या शिक्यासह मुदतठेवींच्या छायाप्रती सादर कराव्यात. | | |
| ५ | आपल्या संस्थेबाबतच्या प्रलंबित तक्रारी, न्यायालयीन प्रकरणे याबाबतची माहिती संस्थाप्रमुखांनी प्रस्ताव सादर करतांना देणे आवश्यक आहे. | | |

| | |
|---|---|
| ६ | सदर कामकाजाचे निगडीत कर्मचाऱ्याचे नाव व मोबाईल क्रमांक देण्यात यावा. |
| ७ | मुदतठेव ज्या अभ्यासक्रमासाठी, ज्या शैक्षणिक वर्षापासून संयुक्त खात्यात ठेवण्यात आलेली आहे त्याचा संपूर्ण तपशील देणे आवश्यक आहे तसेच त्यासंबंधीचे शासन निर्णय व संचालनालयाची मान्यता पत्रे सोबत जोडणे आवश्यक आहे.<br>(संचालनालयाच्या मान्यात पत्रात मुदतठेव पावतीचा क्रमांक व रक्कम नमुद असणे आवश्यक) |
| ८ | मुदतठेवीच्या सर्व प्रकारच्या प्रस्तावात जुन्या मुदतठेवीच्या छायांप्रती जोडणे आवश्यक |
| ९ | मुदतठेव बँक बदल करावयाची असल्यास प्रथम ज्या बँकेमध्ये मुदतठेव ठेवायची आहे त्या बँकमध्ये मुदतठेव ठेवायची व तद्नंतर पुर्वीच्या बँकेतील मुदतठेव मोडण्यास संचालनालयामार्फत परवानगी देण्यात येईल. |

मुदतठेवीचा तपशील खालील तक्त्यात नमुद करावा. तसेच प्रस्ताव कशासाठी सादर केला आहे त्याचे कारण अभिप्रायात नमुद करावे.

| बँकेचे नाव- | | | | | शाखा- | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | अभ्यासक्रम सुरू केल्याचे वर्ष व नाव | खाते क्र. | ठेव पावती क्रमांक | मुदतठेव रक्कम | ठेवीचा दिनांक | ठेव परतीचा दिनांक | कालावधी | अभिप्राय |
| | | | | | | | | |

उपरोक्त प्रमाणेच मुदतठेवीबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात यावा अन्यथा प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही न करता प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात येईल याची सर्व संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.

( डॉ. द. व्यं. जाधव )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- प्रोग्रामर, तं.वि.का.पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

# हमीपत्र

संयुक्त खात्यातील मुदतठेव संस्थेच्या खात्यात जमा करण्याबाबत आम्ही (१) ------------------------ (नाव)---------- अध्यक्ष/सचिव, ------------ (सोसायटी / ट्रस्टचे नाव)----- व (२) ------------------- (प्राचार्य / संचालकांचे नाव)------------- प्राचार्य / संचालक, -----------(महाविद्यालय / शैक्षणिक संस्थेचे नांव) ------------ असे लिहून देतो की,

१. आमच्या संस्थेचे ---------- (महाविद्यालय / शैक्षणिक संस्थेचे नाव)---------, डीटीई संकेतांक ------- हे महाविद्यालय शैक्षणिक वर्ष ---------- पासून अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी / एमबीए / एमएमएस / एमसीए/ पीजीडीएम अभ्यासक्रमाची पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी / पदविकोत्तर पदविका संस्था सुरू आहे. या संस्थेच्या तसेच संस्थेतील अभ्यासक्रमांच्या मान्यतेच्या अनुषंगाने खालील प्रमाणे मुदतठेवी संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय व संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांचे संयुक्त नावे ठेवण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | बँकेचे नांव व पत्ता | मुदतठेव क्रमांक व दिनांक | मुदत ठेव रक्कम | मुदतठेवीचा परिपक्वता (Maturity) दिनांक | मुदत ठेव कालावधी | मुदतठेव ज्या प्रस्तावासाठी ठेवली त्याचे नांव व तपशील | मुदत ठेव परिपक्वता (Maturity) रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |

२. संयुक्त खात्यातील मुदतठेव ठेऊन १० वर्ष झाली असल्याने सदर मुदतठेव संस्थेच्या खात्यात जमा करण्यास संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांना केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने आम्ही -----------------------(नाव)-- --------- अध्यक्ष/सचिव, -------------- (सोसायटी / ट्रस्टचे नाव)------ व ------------------ (प्राचार्य / संचालकांचे नाव)-------------- प्राचार्य / संचालक, -----------(महाविद्यालय / शैक्षणिक संस्थेचे नांव) ---------- या संस्थेच्या वतीने हमी देतो की, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय व संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांच्या संयुक्त खात्यात दहा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ जमा असलेल्या मुदतठेवी व्याजासह संस्थेच्या खात्यात जमा केल्यानंतर आमच्या संस्थेविरुध्द काही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास आणि न्यायालयाने एखाद्या कर्मचा-यास काही रक्कम देण्याचे आदेश दिल्यास अशा रकमेची जबाबदारी पुर्णत: संस्थेची राहील व ही रक्कम कोणत्याही परिस्थितीत संस्थेकडून अदा करण्यात येईल.

ठिकाण :

दिनांक :

सही/-
अध्यक्ष/सचिव

सही/-
प्राचार्य/संचालक